**भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र**

**(सकाळ)**

जा.क्र. ६८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/०२/२०१८

**१) मोबाईलची चोरी . :–**

दिनांक ०२/०२/२०१८ चे १२.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी कल्यान लक्ष्मण सरादे वय ६८ वर्ष रा. दुर्गानगर स्टेशन टोली तुमसर हा ऑफीस कामा करीता ठेवलेला नोकीया कंपनीचा मोबाईल कि. १४,००/रु. चा ऑफीस मध्ये न दिसल्याने, त्याची सिसिटीव्ही फुटेज चेक कले असता, यातील आरोपीने चोरून नेल्याचे, सिसिटीव्ही मध्ये दिसत असल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर कलम ३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावणे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.आरोपी अटक आहे.

**२) संगनमत करून थापड बुक्यांनी मारपीट व काठीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०३/०१/२०१८ चे १५.०० यातील फिर्यादी शांतीदेवी बाळकृष्ण खोब्रागडे वय ३५ वर्ष रा. साकोली हा मित्र विलास पंचबुधे याचेसह पाणी पित असता आरोपी क्र. १ हा शिवीगाळ करीत असतांना फिर्यादीने त्यास शिवीगाळ करू नको, असे हटकले असता, तु बोलनारा होतेस कोण असे म्हणुन आरोपी क्र. १ ने फिर्यादी व त्याचे मित्राला थापड बुक्यांनी मारपीट केली व पुन्हा आरोपी क्र. २ व ३ यांना बोलावुन संगनमत करून तिघांनीही फिर्यादी व त्याचे मित्राला थापड बुक्यांनी मारपीट करून शिवीगाळ केले व आरोपी क्र. १ ने काठीने फिर्यादीचे उजवे कपाडाचे वर डोक्यावर मारून जखमी केले व मित्राचे डोक्यावर देखील मारून जखमी करून मारण्याची धमकी दिल्याने ,फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) विहीरीच्या पाण्यात बुडुन मृत अवस्थेत तरूणाचा प्रेत मिळुन आल्याने मर्ग नोंद . :–**

दिनांक ०२/०२/२०१८ चे १७.०० ते ३/२/२०१८ चे ०८.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादीचा मृतक मुलगा नामे कमलेश उर्फ योगेश गुलाब जनबंधु वय २८ वर्ष, रा. कवलेवाडा हा फिर्यादीचे घरी राहत होता नेहमी प्रमाने दिनांक २/०२/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान घरून सायकल घेवुन फिरून येतो असे बोलुन निघुन गेला परंतु घरी परत आला नाही गावात, नातेवाईकात शोध घेतला असता मिळुन आला नाही करीता पो.स्टे ला दि. ०३/२/२०१८ ला गुम रजिस्टर क्र. ३/१८ ची गुमची रिपोर्ट दिली होती व त्याचा शोध घेतला असता तो फिर्यादीचे शेतात असलेल्या विहीरीचे पाण्यात बुडुन मृत अवस्थेत दिसुन आल्याने फिर्यादी गुलाब महादेव जनबंधु वय ६० वर्ष रा. कवलेवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जायले पो.स्टे गोबरवाही हे करीत आहेत.

**४) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०३/०२/२०१८ चे १३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो हा मुरमाडी तुपकर येथे येणारे जानारे लोकांना अडथळा निर्माण होईल व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. तिजारे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**५ अवैध दारु अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक ०३/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १० लिटर हातभंट्टी दारू + २० किलो सडवा सहित्य किंमती २,६००/–रु, चा माल जप्त करण्यात आला.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०३/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२ तीन सिटर वाहनाकरीता ०९ ईतर वाहनांवरती – ८६ केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.